# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

## साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला

## दि. २८ जानेवारी २०२० – मा. अजिंक्य कोत्तावार

### समस्यांवर संशोधक वृत्तीने काम करा - कोत्तावार



**राजगुरूनगर** - आपण घेत असलेले शिक्षण समाजासाठी किती उपयुक्त आहे, याचा विचार करून विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनात येणाऱ्या समस्यांवर संशोधकवृत्तीने काम करण्याचे आवाहन जागतिक कीर्तीचे युवा संशोधक अजिंक्य कोत्तावार यांनी केले. राजगुरूनगर येथे 'शिक्षणानंतरची क्षितिजे' या विषयावर कोत्तावार बोलत होते. ते म्हणाले की, विद्यार्थ्यांना शिक्षण कशासाठी घ्यायचे याचा प्रथम विचार करावा. विद्यार्थ्यांनी परीक्षेतील गुणांसाठी न शिकता कौशल्यनिर्मितीसाठी शिकायला हवे. मोठे ध्येय निश्चित करून ते छोट्या-छोट्या टप्प्यात विभागून मग ते साध्य करण्यासाठी प्रयत्नशील राहण्याची गरज आहे. संशोधक होण्यासाठी फक्त पुस्तकवाचन आवश्यक नसून इच्छाशक्ती आणि चिकित्सकवृत्तीने समस्येचे निवारण करण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहे. सौरउर्जा ही शाश्वत असून सोलर पॅनेल जर रोज स्वच्छ केले तर ३0 टक्के वीज निर्मिती अधिक होऊ शकेल. यासाठी या संकल्पनेवर संशोधनात्मक काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.

प्रभात Wed, 29 January 2020
epaper.eprabhat.net/c/48440184

लोकमत

## अजिंक्य कोत्तावार : बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत मार्गदर्शन

# विद्यार्थ्यांनी संशोधकवृत्तीने काम करावे

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनातील समस्यांवर संशोधकवृत्तीने काम करावे. शिक्षण कशासाठी घ्यायचे याचा प्रथम विचार करावा, असे प्रतिपादन युवा संशोधक अजिंक्य कोत्तावार यांनी केले. हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत 'शिक्षणानंतरची क्षितिजे' या विषयावर ते बोलत होते.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, मानद सचिव हरि सांडभोर, संचालक ॲड. मुकुंद आवटे, बाळासाहेब सांडभोर, सुशील सिंगवी, मुरलीधर खांकटे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी परीक्षेतील गुणांसाठी न शिकता कौशल्यनिर्मितीसाठी शिकायला हवे. मोठे ध्येय निश्चित करुन ते छोट्या छोट्या टप्प्यात विभागून साध्य करण्यासाठी प्रयत्न करा, अशी युक्तीही त्यांनी सांगितली. विद्यार्थ्यांनी सकारात्मक राहा, प्रयत्नशील राहा, स्वत:वर विश्वास ठेवा, मनातील शक्ती जागृत करा, सोशलमिडियाचा वापर समस्या सोडविण्यासाठी करा, दुसऱ्याशी तुलना न करता स्वत:मधील गुणांचा शोध घ्या. संशोधक होण्यासाठी फक्त पुस्तक वाचन आवश्यक नसून इच्छाशक्ती आणि चिकित्सकवृत्तीने समस्येचे निवारण करण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत. सौरउर्जा ही शाश्वत असून सोलर पॅनेल जर रोज स्वच्छ केले तर ३० टक्के वीज निर्मिती अधिक होऊ शकेल. यासाठी या संकल्पनेवर संशोधनात्मक काम करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. लडाखमधील प्रयोगशील संशोधक सोनम वायचुंग यांच्याबरोबर करीत असलेल्या कामाबद्दलही त्यांनी माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. धनंजय बोऱ्हाडे, परिचय प्रा. अमृता नाईकरे यांनी तर आभार वैभव लोहकरे याने मानले.



राजगुरु महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत मार्गदर्शन करताना अजिंक्य कोत्तावार.

> आजूबाजूच्या समस्यांमधून माझे संशोधन जन्माला आले. चहाच्या पानांपासून तयार केलेले बायोडिझेल, एकाच वाहनात डिजेल व पेट्रोलची सोय असणारे इंजिन, हवेच्या शक्तीवर होणारे मोबाईल चार्जिंग, सहज वाहून नेता येईल असा २०० लिटरचा पाण्याचा ड्रम, एक लिटर पेट्रोलवर सुमारे ७० कि.मी.चालणारी चारचाकी गाडीचे इंजिन अशी अनेक संशोधन केली. मी वयाच्या २६ व्या वर्षी १८ पेटंट मिळविणारा देशातील तरुण संशोधक ठरलो.
>
> **-अजिंक्य कोत्तावार,** युवा संशोधक

# 'विद्यार्थ्यांनी समाजातील प्रश्नांवर संशोधकवृत्तीने काम करावे'

## साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला

**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** आपण घेत असलेले शिक्षण समाजासाठी किती उपयुक्त आहे याचा विचार करून विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनात येणाऱ्या समस्यांवर संशोधकवृत्तीने काम करण्याचे आवाहन जागतिक कीर्तीचे युवा संशोधक अजिंक्य कोत्तावार यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'शिक्षणानंतरची क्षितिजे' या विषयावर बोलत होते.

या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक ॲड. मुकुंद आवटे, बाळासाहेब सांडभोर, मुरलीधर खांगटे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

अजिंक्य कोत्तावार यांनी विद्यार्थ्यांना शिक्षण कशासाठी घ्यायचे याचा प्रथम विचार करण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी परीक्षेतील गुणांसाठी न शिकता कौशल्यनिर्मितीसाठी शिकायला हवे असे सांगून मोठे ध्येय निश्चित करून ते छोट्या छोट्या टप्प्यात विभागून मग ते साध्य करण्यासाठी प्रयत्नशील राहण्याची गरज व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी सकारात्मक राहा, सतत प्रयत्नशील राहा, स्वत:वर विश्वास ठेवा, मनातील शक्ती जागृत करा, सोशलमीडियाचा वापर समस्या सोडविण्यासाठी करा, दुसऱ्याशी तुलना न करता स्वत:मधील गुणांचा शोध घेण्याचे आवाहन त्यांनी केले. संशोधक होण्यासाठी फक्त पुस्तकवाचन आवश्यक नसून इच्छाशक्ती आणि चिकित्सकवृत्तीने समस्येचे निवारण करण्यासाठी प्रयत्न आवश्यक असल्याचे ते म्हणाले. सौरउर्जा ही शाश्वत असून सोलर पॅनेल जर रोज स्वच्छ केले तर ३० टक्के वीज निर्मिती अधिक होऊ शकेल. यासाठी या संकल्पनेवर संशोधनात्मक काम करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. धनंजय ब्रोन्हाडे, परिचय प्रा. अमृता नाईकरे यांनी तर आभार वैभव लोहकरे या विद्यार्थ्याने मानले.

# विद्यार्थ्यांनी समाजातील प्रश्नांवर संशोधकवृत्तीने काम करावे : अजिंक्य कोत्तावार

**राजगुरूनगर । वार्ताहर**

आपण घेत असलेले शिक्षण समाजासाठी किती उपयुक्त आहे याचा विचार करून विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनात येणाऱ्या समस्यांवर संशोधकवृत्तीने काम करण्याचे आवाहन जागतिक कीर्तीचे युवा संशोधक अजिंक्य कोत्तावार यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'शिक्षणानंतरची क्षितिजे' या विषयावर बोलत होते. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक ॲड. मुकुंद आवटे, बाळासाहेब सांडभोर, मुरलीधर खांगटे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते. अजिंक्य कोत्तावार यांनी विद्यार्थ्यांना शिक्षण कशासाठी घ्यायचे याचा प्रथम विचार करण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी परीक्षेतील गुणांसाठी न शिकता कौशल्यनिर्मितीसाठी शिकायला हवे असे सांगून मोठे ध्येय निश्चित करून ते छोटया छोटया टप्प्यात विभागून मग ते साध्य करण्यासाठी प्रयत्नशील राहण्याची गरज व्यक्त केली.

# 'प्रत्येकात अमर्याद माइंड पॉवर'

''प्रत्येक व्यक्तीमध्ये अमर्याद 'माइंड पॉवर' आहे. तिचा वापर करण्यासाठी जीवनाचे ध्येय आणि दिशा कॉलेज जीवनात निश्चित करणे आवश्यक आहे. त्यानंतर 'लॉ ऑफ अॅट्रॅक्शन'चा फायदा करून घेण्यासाठी सतत त्या ध्येयाचा विचार, पाठलाग आणि आवश्यक बाबींची अंमलबजावणी केली पाहिजे,'' असा सल्ला राष्ट्रीय कीर्तीचे युवा संशोधक अजिंक्य कोत्तावार यांनी दिला.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत 'शिक्षणानंतरची क्षितिजे' या विषयावर ते बोलत होते. कोत्तावार म्हणाले, ''आपण घेत असलेले शिक्षण समाजासाठी किती उपयुक्त आहे? याचा विचार करून विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनात येणाऱ्या समस्यांवर संशोधक वृत्तीने काम केले पाहिजे. परीक्षेतील गुणांसाठी न शिकता कौशल्यनिर्मितीसाठी शिकायला हवे.''



**कोत्तावार**

''सकारात्मक रहा. प्रयत्नशील रहा. सोशलमीडियाचा वापर समस्या सोडविण्यासाठी करा. स्वतःमधील गुणांचा शोध घ्या. परिस्थिती किंवा लोकांना दोष देत सबबींच्या मागे लागू नका,'' असे आवाहन त्यांनी केले.

आजूबाजूच्या समस्यांमधून माझे संशोधन जन्माला आले, असे सांगून ते म्हणाले, ''चहाच्या पानांपासून तयार केलेले बायोडिझेल, एकाच वाहनात डिझेल, पेट्रोलची सोय असणारे इंजीन, हवेच्या शक्तीवर होणारे मोबाईल चार्जिंग, सहज वाहून नेता येईल असा २०० लिटरचा पाण्याचा ड्रम, एक लिटर पेट्रोलवर सुमारे ७० किमी चालणारे चारचाकीचे इंजीन अशी अनेक संशोधने केली. वयाच्या २६ व्या वर्षी १८ पेटंट मिळविणारा देशातील तरुण संशोधक ठरलो होतो. लडाखमधील प्रयोगशील संशोधक सोनम वायचुंग यांच्याबरोबर काम करण्याचीही संधी मिळाली.''

सूत्रसंचालन प्रा. धनंजय बोऱ्हाडे यांनी केले. परिचय प्रा. अमृता नाईकरे यांनी करून दिला. आभार वैभव लोहकरे याने मानले.

)istrict-Today
20 Page No. 6

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख